| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रकाचे स्वरुप | मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माते (Bulk Waste Generator) करून कचरा जिरवणाऱ्या गृहनिर्माण संस्था/संकुले यांचेकरिता मिळकत सवलत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/ ०१ /२०२२, दिनांक १५ / ०२ /२०२२ |
| विषय : | कम्पोस्टिंग यंत्रणा,एसटीपी प्लांट,तसेच झिरो वेस्ट संकल्पना राबविणाऱ्या निवासी इमारतींमधील मिळकतधारकांना साफसफाई करामध्ये सवलत देणेबाबत |
| कोणाच्या माहिती / कार्यवाहीसाठी | मिळकत कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १.घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६<br>२.घनकचरा(व्यवस्थापन व हाताळणी),स्वच्छता व आरोग्य उपविधी,दि.१जुलै२०१९<br>३.स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान (नागरी) प्रकल्प कक्ष यांचेकडील पत्र क्र.स्वमअक/१/कावि/१४९/२०२१ दि.१२/१०/२०२१<br>४.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४०ब<br>५. मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ७६०,दिनांक २४/१२/२०२१ |

परिपत्रक,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ व १२९ मधील तरतूदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारती व जमिनी यावर मिळकतकराची आकारणी करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० ब नुसार परिस्थितीकीय दृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेबाबत तरतूद आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण क्रमांक २०४,दिनांक १ जुलै २०१९ नुसार प्रसिद्ध उपविधी "महानगरपालिकासाठी घनकचरा(व्यवस्थापन व हाताळणी),स्वच्छता व आरोग्य उपविधी" मध्ये नमूद ३ चे ३.११ नुसार - मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माते (Bulk Waste Generator) म्हणजे दररोज सरासरी १०० किलो पेक्षा जास्त कचरा निर्माण करणारी व्यक्ती,घरे,गृहनिर्माण संस्था/संकुले, यांचा समावेश होतो.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा उत्पन्न करणाऱ्या (Bulk Waste Generator) निवासी आस्थापनांना " घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६" अन्वये ओला कचरा जिरविण्यासाठी ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा एसटीपी प्लांट,तसेच झिरो वेस्ट संकल्पना राबविणाऱ्या निवासी आस्थापनांना साफसफाई करात सवलत दिलेस महापालिकेच्या दैनंदिन कचरा संकलनामध्ये घट होऊन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता होणाऱ्या खर्चामध्ये कपात होणार आहे.

सबब,पिंपरी चिंचवड शहरातील Bulk Waste Generator निवासी आस्थापनांमार्फत ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा उभारणाऱ्या, एसटीपी उभारणाऱ्या व झिरो वेस्ट ही संकल्पना राबविणाऱ्या निवासी आस्थापनांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० ब मधील तरतूदीनुसार व मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ७६०,दिनांक २४/१२/२०२१ चे मान्यतेनुसार मिळकतकर बिलाचे करामध्ये खालील प्रमाणे सवलत देणेत यावी.

| क्र. | निकष | साफसफाई करात सवलत |
|---|---|---|
| १ | ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना (ओला कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या आस्थापना) | २०% |
| २ | ऑनसाईट कपांस्टींग यंत्रणा व एसटीपी कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना | ३०% |
| ३ | झिरो वेस्ट संकल्पना राबविणारी निवासी आस्थापना (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या आस्थापना) व एसटीपी कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना | ५०% |

परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/९/कावि/ ०१ /२०२१,दिनांक१५/०२/२०२२चे संलग्न

खालील नमूद अटी व शर्तीचे अधीन उपरोक्त नमूद मिळकतकराचे साफसफाई करातील सवलत देय राहील.

१) गृहनिर्माण संस्था/संकुले/व्यक्ती यांनी मागणी केलेनुसार,विषयांकित सवलत लागू करणेकरिता ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा व झिरो वेस्ट यंत्रणा कार्यान्वीत असलेबाबतचे प्रमाणपत्र ,अर्ज प्राप्त झालेपासून १५ दिवसाचे आत संबधित क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून निर्गत करणेत येईल.

२) संबधित गृहनिर्माण संस्था/संकुले/व्यक्ती यांनी दिनांक १ एप्रिल ते ३० सप्टेंबर (पहिली सहामही) या करिता दिनांक ३० सप्टेंबरपूर्वी तसेच दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ मार्च ( दुसरी सहामही) करिता ३१ मार्च पूर्वी स्वतंत्ररित्या online अर्ज करणे बंधनकारक राहील.प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने तपासणीअंती क्षेत्रिय अधिकारी यांचेकडून निर्गत प्रमाणपत्रानुसार संबधिताना लगतचे पुढील वर्षी साफसफाई करात यथाप्रमाणात सवलत देय राहील.

३) सदर दाखल्यासोबत संबधित गृहनिर्माण संस्था/संकुले यांनी सभासदांचे नावे मिळकत क्रमांक असलेबाबतचे पत्र सादर केलेनंतर लगतचे वर्षाच्या फक्त चालू मागणीमधील साफसफाई करामध्ये उक्त निकषांमध्ये प्रस्तावित केलेनुसार मिळकतकर सवलत लागू होईल.

४) उपरोक्त अ.क्र. १ मध्ये नमूद केलेले प्रमाणपत्र व पत्र हे गृहनिर्माण संस्था/संकुले यांनी दरवर्षी मुदतीत सादर करणे बंधनकारक आहे.त्यानंतरच मिळकत करामध्ये सवलत देणेत येईल.

५) सदर सवलतीकामी संपूर्ण मिळकतकर ३० जून पूर्वी थकबाकी रकमेसह व एकरकमी भरणा करणे आवश्यक राहील. (मिळकतकर बिले मिळो अथवा न मिळो)

६) संबधित क्षेत्रीय कार्यालयाच्या आरोग्य व जलनिस्सारण विभागाने त्यांचे कार्यक्षेत्रातील गृहनिर्माण संस्था/संकुले यांचे मागणीनुसार उपरोक्त अ.क्र. १ मध्ये नमूद केलेले दाखले प्रत्यक्ष तपासणी करून मुदतीत द्यावयाचे आहे.

७) ग्रिहा व स्वग्रिहा मालमत्ताकर सवलत किंवा सदर सवलत योजना यापैकी एका सवलत योजनेचा लाभ घेता येईल.

परिपत्रकाचे दिनांकापासून सदर योजनेची अंमलबजावणी करणेत यावी.

15/02/22

(राजेश पाटील)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति:-

१) क्षेत्रिय अधिकारी, सर्व क्षेत्रीय कार्यालय,
गृहनिर्माण संस्था/संकुले/व्यक्ती यांनी मागणी केलेनुसार मुदतीत प्रमाणपत्र देणेची कार्यवाही करणेत यावी.

२) प्रशासन अधिकारी / सहा.मंडलाधिकारी/कर्मचारी, सर्व करसंकलन विभागीय कार्यालय,
२/- सदर परिपत्रक सर्व गटप्रमुखांचे निदर्शनास आणून देणेत यावे. परिपत्रकातील अटी व शर्तीचे अधीन कार्यवाही करणेत यावी व सदर परिपत्रक विभागाचे नोटीस फलकावर डकविणेत यावे.

३) माहिती व जनसंपर्क विभाग - योग्य त्या प्रसिद्धीसाठी

सहाय्यक आयुक्त,करसंकलन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.